**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक- वेतन - २०२१/२०२१-२२/०८/वेतनपथक, पुणे दिनांक - २० ऑक्टोबर, २०२१

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,
विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
**कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर सस्था, पुणे

**विषय - तासिका तत्वावरील अधिव्याख्यात्यांचे मानधनाबाबत..**

आपल्या महाविद्यालयामध्ये विविध विषयांसाठी रिक्त असलेल्या पदांवर ज्या शिक्षक कर्मचा-यांची तासिका तत्वावर नियुक्ती करण्यात आली होती त्याबाबत आपणाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार देय ठरणारी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. परंतु तरीदेखील अजूनही काही महाविद्यालयांनी सन २०२०-२१ व २०२१-२२ या कालावधीतील देय रकमेबाबतची माहिती सादर केलेली नाही. सबब सदर माहिती प्रस्तुत कार्यालयास दिनांक २६.१०.२०२१ पर्यंत सादर करण्यात यावी. सदर प्रस्ताव नियमानुसार सादर करण्याची जबाबदारी संबंधित प्राचार्यांची असेल. सदरहू माहिती सादर करतांना खाली दिलेल्या सर्व सूचना विचारात घ्याव्यात.

**सन २०२०-२१ साठी प्रस्ताव सादर करतांना खालील सुचना विचारात घ्याव्यात.**

१. आपल्या महाविद्यालयाची माहिती तयार करतांना महिनानिहाय तयार करण्यात यावी.

२. विद्यापीठाने शैक्षणिक वर्षे सन २०२०-२०२१ साठी निर्धारीत केलेले वेळापत्रकाप्रमाणेच अध्यापकांच्या मानधनाबाबत परिगणना करण्यात यावी.

३. तासिका तत्वावर नियुक्त करण्यासाठी सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे यांनी सन २०१९-२० मध्ये दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

५. तासिका तत्वावर कर्मचारी नियुक्त करण्यासाठी सन २०१९-२० मध्ये दिलेल्या जाहिरातीची प्रत प्रस्तावासोबत जोडण्यात यावी.

६. आपल्या महाविद्यालयातील ज्या कर्मचा-यांची नियुक्ती तासिका तत्वावर करण्यात आलेली आहे त्यांना दिलेल्या नियुक्तीचे आदेश व रुजू अहवालाची प्रत जोडणे आवश्यक आहे. (सन १०१९-२० व सन २०२०-२१)

७. नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-याचे नियुक्तीस आपले महाविद्यालय ज्या अकृषी विद्यापीठाशी संलग्नीत आहे त्यांनी आपल्या महाविद्यालयामध्ये तासिका तत्वावर नुियक्त केलेल्या कर्मचा-याचे नियुक्ती संदर्भात दिलेल्या मान्यतेची प्रत जोडणे आवश्यक आहे. (सन १०१९-२० व सन २०२०-२१)

८. तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या कर्मचा-याने रुजू होते वेळी तासिका तत्वावरील नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्त असल्याने त्यास नियमित सेवेचे कोणतेही हक्क प्राप्त होत नाहीत, त्यामुळे भविष्यात सेवेत कायम करण्याची मागणी/नियमित सेवेच्या कोणत्याही हक्काची मागणी करणार नाही, तसेच त्यास एकावेळी एकाच महाविद्यालयात काम करता येईल, असे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर दिलेले हमीपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

९. शासन निर्णय दिनांक १४ नोव्हेंबर २०१८ मधील तरतुदीनुसार सदरचे प्रस्ताव सादर करावेत.

**सन २०२०-२१ चे विवरणपत्र**

**तासिका तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षक कर्मचा-यांना देय असलेली रक्कम दर्शविणारे विवरणपत्र**

**Name of the College -** **College Code -** **Htesevaarth id –**

| अ. क्र. | विषय | सहसंचालक (उ. शि.) पुणे यांनी मान्यता दिलेल्या शिक्षकांची संख्या | तासिका तत्वावर नियुक्त शिक्षकाचे नांव | महिना | सैध्दांतिक | | | प्रात्यक्षिक | | | एकूण देय रक्कम रु. (९+१२) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | घेतलेल्या तासिकांची संख्या | दर प्रति तास रु. | एकूण देय रक्कम रु. | घेतलेल्या प्रात्यक्षिकांची संख्या | दर प्रति तास रु. | एकूण देय रक्कम रु. | |
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

वरील संपुर्ण माहिती अचुक असून बरोबर असल्याची खात्री मी स्वतः श्री/श्रीमती ---------------- केलेली आहे.

प्राचार्य
महाविद्यालयाचे नांव

**सन २०२१-२२ साठी प्रस्ताव सादर करतांना खालील सुचना विचारात घ्याव्यात.**

१. आपल्या महाविद्यालयाची माहिती तयार करतांना महिनानिहाय तयार करण्यात यावी.

२. तासिका तत्वावर नियुक्त करण्यासाठी सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे यांनी सन २०२१-२२ मध्ये दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

३. तासिका तत्वावर कर्मचारी नियुक्त करण्यासाठी सन २०२१-२२ मध्ये दिलेल्या जाहिरातीची प्रत प्रस्तावासोबत जोडण्यात यावी.

४. आपल्या महाविद्यालयातील ज्या कर्मचा-यांची नियुक्ती तासिका तत्वावर करण्यात आलेली आहे त्यांना दिलेल्या नियुक्तीचे आदेश व रुजू अहवालाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

५. नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-याचे नियुक्तीस आपले महाविद्यालय ज्या अकृषी विद्यापीठाशी संलग्नीत आहे त्यांनी आपल्या महाविद्यालयामध्ये तासिका तत्वावर नुियक्त केलेल्या कर्मचा-याचे नियुक्ती संदर्भात दिलेल्या मान्यतेची प्रत जोडणे आवश्यक आहे.

६. तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या कर्मचा-याने रुजू होते वेळी तासिका तत्वावरील नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्त असल्याने त्यास नियमित सेवेचे कोणतेही हक्क प्राप्त होत नाहीत, त्यामुळे भविष्यात सेवेत कायम करण्याची मागणी/नियमित सेवेच्या कोणत्याही हक्काची मागणी करणार नाही, तसेच त्यास एकावेळी एकाच महाविद्यालयात काम करता येईल, असे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर दिलेले हमीपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

७. शासन निर्णय दिनांक १४ नोव्हेंबर २०१८ मधील तरतुदीनुसार सदरचे प्रस्ताव सादर करावेत.

**सन २०२१-२२ चे विवरणपत्र**

**तासिका तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षक कर्मचा-यांना देय असलेली रक्कम दर्शविणारे विवरणपत्र**

**Name of the College -** **College Code -** **Htesevaarth id –**

| अ. क्र. | विषय | सहसंचालक (उ. शि.) पुणे यांनी मान्यता दिलेल्या शिक्षकांची संख्या | तासिका तत्वावर नियुक्त शिक्षकाचे नांव | महिना | सैध्दांतिक | | | प्रात्यक्षिक | | | एकूण देय रक्कम रु. (९+१२) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | घेतलेल्या तासिकांची संख्या | दर प्रति तास रु. | एकूण देय रक्कम रु. | घेतलेल्या प्रात्यक्षिकांची संख्या | दर प्रति तास रु. | एकूण देय रक्कम रु. | |
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

वरील संपुर्ण माहिती अचुक असून बरोबर असल्याची खात्री मी स्वतः श्री/श्रीमती ---------------- केलेली आहे.

प्राचार्य
महाविद्यालयाचे नांव

**सही/-**
(डॉ. किरणकुमार बोंदर)
सहसंचालक (उच्च शिक्षण),
पुणे विभाग, पुणे